Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Impact Factor – 7.139 ISSN – 2319 - 8648

Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

June, 2026
Issue- VI, Vol. I

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Vilas Surybhan Tale
Associate Professor,
Department of Political Science,
Coordinator, IQAC, Arts College Buldhana

Shaurya Publication , Latur

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

Index

1. A Study of Women's Political Participation in Panchayati Raj Institutions: With Special Reference to Latur District — 07
Prof**. Ajinkya Surendra Kadam, Dr. P. K. Nandeshwar**

2. A Comparative Review of the Concept of Liberty in the Political Philosophy of Isaiah Berlin, John Rawls and Robert Nozick — 13
Anshul C. Wankhede, Dr. Vedprakash Dongaonkar

3. Institutional Gender Parity and Policy Transformation: A Critical Inquiry into the Constitution (106th Amendment) Act, 2023 and Democratic Governance in India — 22
Akshay Govind Pawar Prof. Dr. Vilas S. Tale

4. Digital Governance and Last Mile Service Delivery- An Indian Context — 27
Prabodh Janardan Wankhade, Prof. Dr. Vilas Gaikwad

5. Role of Zilla Parishads in District Administration: A Study of Maharashtra — 35
Chaitanya Ashok Bagade, Dr.Vilas Gaikwad

6. Political Socialization and Democratic Citizenship in Indian Schools: A Conceptual Review — 40
Shubham Bhimrao Gawai, Prof. (Dr.) Vilas S. Tale

7. Women's Empowerment Beyond Borders: in Indian Diasporic Literature — 45
S.k. Mateen,[1] S.k. Nazeer[2]

8. अमरावती जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या योजनांचा विकासात्मक अभ्यास — 51
भारत सिताराम डोंगरे, डॉ. विलास गायकवाड

9. लोकसभा निवडणूक २०२४ मधील दिव्यांग मतदारांचा सहभाग : बुलडाणा तालुक्याचा एक विश्लेषणात्मक अभ्यास — 60
प्रशांत आनंदा हिवाळे, प्राचार्य, डॉ. सुरेश रामभाऊ बाठे

10. कृत्रिम बुद्धिमत्तेचा लोकशाहीतील निवडणुकांवरील प्रभाव : एक संशोधनात्मक अभ्यास — 62
डॉ. विलास एस्. टाले

11. संत गाडगेबाबांच्या कीर्तनांतील सामाजिक परिवर्तनाची संकल्पना — 75
गजेंद्र सोनबा टोम्पे, डॉ. विष्णू नामदेव लांडे

12. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व व आंबेडकरवादी विचार — 81
कु. शुभांगी संजय चोथमल, डॉ. विष्णू नामदेव लांडे

13. 'बारोमास' या कादंबरीतील सुशिक्षितांच्या समस्या — 85
श्री विठ्ठल गणपत महाल्ले, डॉ. विष्णू नामदेव लांडे

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

14. जोगते व देवदासी : प्रथा व जीवन 90

प्रा. डॉ. सिद्धेश्वर नवलाखे

15. भारतातील इतर राज्यांच्या विधान परिषदांच्या तुलनेत महाराष्ट्र विधान परिषदेचा तुलनात्मक अभ्यास 96

कुणाल सोपान इंगळे, प्रा. डॉ. विलास एस. टाले

16. अंतिम सत्याचे स्वरूप: डॉ. बी. आर. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या तात्त्विक दृष्टिकोनाचे तुलनात्मक विश्लेषण. 102

योगेश रामभाऊ मडावी, डॉ. वेदप्रकाश डोणगावकर

17. मराठीतील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त बालकांदबऱ्यांचे स्वरुप व त्यांचे शिक्षणातील स्थान 106

प्रतिमा रामकृष्ण कस्तुरे प्रा.डॉ.एस.ई.नवलाखे

18. भारतीय निवडणुकांवर दहशतवादाचा राजकीय परिणाम 112

अरबाज रोशन तडवी, प्रा.डॉ. विलास एस. टाले

19. शैक्षणिक प्रगती आणि राजकीय इच्छाशक्ती: भारतातील शिक्षण धोरणांचा राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास 116

रवींद्र मंगीलाल जाधव, डॉ. पी. के. नंदेश्वर

20. संतवाणी : आधुनिक काळाची अपरिहार्य गरज 120

बिरादार भाग्यश्री ज्ञानेश्वर

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

16 अंतिम सत्याचे स्वरूप: डॉ. बी. आर. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या तात्त्विक दृष्टिकोनाचे तुलनात्मक विश्लेषण.

योगेश रामभाऊ मडावी
संशोधक विद्यार्थी

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
संशोधन मार्गदर्शक

संशोधन केंद्र -तत्त्वज्ञान विभाग,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

सारांश

भारतीय चिंतन परंपरेतील आस्तिक व नास्तिक दर्शनाचा अभ्यास केला असता आपल्याला असे दिसून येईल की आस्तिक दर्शनातील 'अंतिम सत्य' विषयाचा दृष्टिकोन हा बहुतांश अध्यात्मिक व पारलौकिक स्वरूपाचा आहे. त्यात ईश्वर किंवा ब्रह्म संकल्पनेला अंतिम सत्य मानले आहे. याच तत्वांशी निगडित महात्मा गांधीजींचे 'सत्य हेच ईश्वर' ही संकल्पना आधारित आहे. परंतु दुसरीकडे नास्तिक दर्शनाचा बहुतांश कल हा अध्यात्मिकतेला वगळून वास्तववादी, व्यावहारिक तसेच सामाजिक नैतिक मूल्यांकडे झुकलेला दिसतो. त्याच विचारधारेतील आधुनिक चिंतन परंपरेतील नवयान बौद्ध संकल्पनेचे पुरस्कर्ते डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी 'धम्म' संकल्पनेला प्रज्ञा, करुणा, समता तसेच सामाजिक नैतिक मूल्यांशी समन्वय साधून अंतिम सत्यचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच माणूस आणि समाजातील परस्पर नैतिक संबंध व विज्ञानवादी दृष्टिकोनाचा अवलंब करत अध्यात्मिक व पारलौकिक तत्वांचे खंडन करून वास्तविकतेचा बोध घडून आणण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीजींच्या अंतिम तत्त्वाबद्दलचा वैचारिक दृष्टिकोन हा अहिंसाच्या मार्गाने सत्याचा शोध घेणे असून 'सत्य हेच ईश्वर' आहे.

हा संशोधन निबंध अंतिम सत्याचे प्रमाण सिद्ध करत असताना दोन्ही विचारवंतांनी कोणकोणत्या तत्त्वांवर भर दिला त्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो.

सूचक शब्द (Keywords):

अंतिम सत्य, ईश्वर, ब्रह्म, धम्म, करुणा, प्रज्ञा, समता, अध्यात्मिक, पारलौकिक, सामाजिक, वास्तववादी, व्यावहारिक, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता, तात्विक विश्लेषण, अहिंसा.

1. प्रस्तावना

आधुनिक भारतातील दोन मुख्य विचारधारा म्हणजे डॉ. बी. आर. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचे सामाजिक, पारंपारिक, राजकीय तसेच नैतिकतेतील योगदान होय. बाबासाहेबांनी ईश्वर, ब्रह्म, आत्मा, मोक्षप्राप्ती इत्यादी अध्यात्मिक स्वरूपाचे अस्तित्व नाकारून वास्तविकता व विज्ञानवादी दृष्टिकोनाला चालना देत अंतिम सत्याच्या स्वरूपाला नैतिक आणि सामाजिक संकल्पनेशी जोडून 'धम्म' या संकल्पनेला महत्त्व दिले. त्यांच्या मते नैतिकता म्हणजेच धम्म जे की प्रज्ञा करूणा आणि समतेच्या तात्विक एकत्रिकरणाने अंतिम सत्याचे दर्शन घडवते. आधुनिक जगातील नास्तिक विचारधारेचा विचार करून

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

महात्मा गांधींनी 'ईश्वर हेच सत्य' या संकल्पनेकडून 'सत्य हेच ईश्वर' अशी संकल्पना अस्तित्वात आणली. जे की त्यांच्या विचार प्रणालीतील अध्यात्मिक तत्वांत झालेले परिवर्तन दर्शवते.

2. संशोधन समस्येचे विधान

वास्तविक पाहता तत्त्वचिंतनातील मुख्य उद्देश अंतिम सत्याचा शोध घेणे आहे. मग तो मर्यादित घटकापुरता असो की वैश्विक स्वरूपाचा, परंतु वैश्विक स्वरूपातील अंतिम सत्याचे स्पष्टीकरण करत असताना अध्यात्मिक व वास्तववादी तसेच नैतिक संकल्पनांचा आधार घेतला जातो व वैचारिक विरोध निर्माण होतो. अशावेळी कोणत्या विचारधारेतील संकल्पनांचा निसंशयपणे स्वीकार करायचा किंवा नाही असा एक प्रश्न पडतो.

3. उद्दिष्टे:

3.1. डॉ. बी. आर. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या 'अंतिम सत्य' संकल्पनेचा तात्त्विक दृष्टिकोन अभ्यासणे.

3.2. या दोन्ही मुख्य विचारधारेतील तात्त्विक दृष्टिकोनाचा तुलनात्मक अभ्यास करून आधुनिक जगातील उपयुक्तता शोधणे.

3.3. गांधीजींच्या सत्य व अहिंसा आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या धम्म संकल्पनेशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करणे.

3.4. आधिभौतिक व अनुभवाआधारीत दृष्टिकोनाचा तात्त्विक अभ्यास करणे.

4. महात्मा गांधीजींची 'सत्य हेच ईश्वर' संकल्पना

आधुनिक भारतातील मुख्य विचारधारेपैकी एक गांधीवादी विचारधारा वैदिक तत्त्वांवर आधारलेली दिसते. त्यांच्या मते विश्वाची निर्मिती आणि नियंत्रण एका विशिष्ट शक्तीद्वारे केली जाते, ती शक्ती म्हणजे ईश्वर जे की ब्रह्मस्वरूप अंतिम सत्य आहे.

4.1. **साधन आणि साध्यांचे तत्व** सांगताना गांधीजी म्हणतात की अंतिम सत्याचे जाणीव निव्वळ वाचनाने किंवा तर्काने होत नसून त्यासाठी साधन आणि साध्यांची सांगड घालण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या मते सत्याचा शोध घेण्यासाठी 'अहिंसा' हे एक मात्र साधन आहे.गांधीजींच्या तत्त्वानुसार अहिंसेचे काटेकोर पालन करून मानवी अहंकाराचा नाश करता येतो व अशा पद्धतीने अंतिम सत्याचे ध्येय गाठता येते.

4.2. अंतरात्मा आणि आत्मसाक्षात्कार: गांधीजींच्या मते आत्मचिंतनाने अंतिम सत्याची प्राप्ती म्हणजेच ब्रह्म रूपाची जाणीव होणे/आत्मसाक्षात्कार होय. त्यांच्या मते प्रत्येक मानवी घटकांमध्ये ब्रह्मांचा अंश अस्तित्वात आहे त्यामुळे आत्मसाक्षात्कार होतो तेव्हा अंतरात्मा जागृत होते. त्यापुढे मानवी जीवनातील नैतिक मूल्य दुय्यम ठरतात.

4.3. बदलत्या काळानुरूप गांधीजींच्या वैचारिक स्वरूपात झालेला मुख्य बदल म्हणजे 'ईश्वर हेच सत्य' या संकल्पनेचा 'सत्य हेच ईश्वर' मध्ये झालेले रूपांतर होय. यामागील त्यांचा तात्त्विक दृष्टिकोन असा आहे की, ईश्वर या संकल्पनेला धार्मिक आणि सांस्कृतिक मर्यादा आहेत. जसे की नास्तिक विचाराची माणसे ईश्वराचे अस्तित्व नाकारू शकतात, परंतु सत्य ही संकल्पना कोणालाही नाकारता येत नाही. कारण

Issue VI , Vol. I (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June, 2026 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

नास्तिक सुद्धा सत्याचा शोध घेत असतो. त्यामुळे सत्याला सर्व मान्यता मिळते. गांधीजींच्या मते सत्य म्हणजे केवळ खरे बोलणे नसून तेच शाश्वतता आहे.

5. धम्म संकल्पना आंबेडकरांचा एक तात्त्विक विचार

एक आधुनिक अनुभवाधारीत प्रमाणाला मानणारे विचारवंत डॉ. बी. आर. आंबेडकरांनी अध्यात्मिक संकल्पनेचे अस्तित्व नाकारून मानवी मूल्यांच्या नैतिक स्वरूपाला प्राथमिकता देवून बौद्ध दर्शनाच्या तत्त्वांवर आधारित नवया संकल्पनेची मांडणी केली. त्यांच्या मते अंतिम सत्य हे ईश्वर किंवा ब्रहम नसून मानवाला सामाजिक नैतिकतेशी जोडून ठेवणारी तत्वे (प्रज्ञा, करुणा, समता इ.) आहेत.

5.1. **प्रज्ञा, करुणा, आणि समतेचे तात्त्विक त्रिसूत्र**

डॉ. आंबेडकरांच्या मते, धम्माचे अंतिम सत्य हे प्रज्ञा, करुणा आणि समतेवर आधारित आहेत. प्रज्ञा म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाने अज्ञान आणि अंधश्रद्धेचा त्याग करून कोणत्याही ग्रंथातील तत्त्वाला जसेच्या तसे न स्वीकारता स्वबुद्धीने सत्याचा शोध घेणे होय. करुणा म्हणजे मानवाप्रती दया आणि प्रेम होय तसेच सर्व समभावाने समतेच्या दृष्टीने सामाजिक न्याय मिळवणे.

5.2. नैतिकता म्हणजे धम्म: तात्त्विक दृष्टिकोन पटवून देताना बाबासाहेब पारंपारिक धर्मातील ईश्वर उपासनेवर टीका करून सांगतात की नैतिकता म्हणजे मानवाचा समाजाशी व्यावहारिक शुद्धता राखून ठेवणारे साधन होय. वैयक्तिक नियमापलीकडे त्याचे पवित्रता साधताना नैतिकता ही धम्म बनते व समाजाचे संतुलन टिकून ठेवण्यासाठी आणि मानवी मुक्तीसाठी सामाजिक नैतिक हेच अंतिम सत्य ठरते.

6. दोन्ही विचारधारेचा तुलनात्मक तात्त्विक विश्लेषण

6.1. **सत्याचा उदय** हा महात्मा गांधींच्या मते आध्यात्मिक अलौकिक स्वरूपाचा तर डॉ. आंबेडकरांच्या मते अनुभव आधारित, विज्ञानवादी व सामाजिक स्वरूपाचा आहे.

6.2. महात्मा गांधींच्या मते तात्त्विक ध्येय हे ईश्वर आणि आत्मा यांचे एक्य आहे आणि डॉ. आंबेडकरांच्या नुसार मानव व सामाजिक नैतिकता आहे.

6.3. महात्मा गांधींच्या मते अंतिम ध्येय हे आत्मशुद्धी, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने गाठता येते तर डॉ. आंबेडकरांच्या मते ते प्रज्ञा, करुणा, समता, शिक्षण इत्यादी मूल्यांद्वारे नैतिकता साध्य करता येते.

6.3. महात्मा गांधींच्या मते अंतिम सत्य हे सनातन आहे परंतु समाजातील काही विकृतीमुळे मूळ स्वरूपात बदल दिसून येतो. याउलट आंबेडकरांच्या मते समाजातील विकृती म्हणजे जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था याला पूर्णता नष्ट करणे हेच सामाजिक दृष्ट्या अंतिम सत्य आहे.

6.4. गांधीजींच्या मते मुक्ती म्हणजे आत्मसाक्षात्कार व जीवन मरणाच्या चक्रातून सुटका होय. परंतु आंबेडकरांच्या मते तसे नसून समाजातील प्रत्येक मानवी घटकाला स्वतंत्रपणे, समानतेने तसेच स्वाभिमानाने जगण्याची मुभा मिळणे होय.

6.5. गांधीजींचा वेदातील सनातन स्वरूपावर विश्वास असून मूळ वर्णव्यवस्थेला ते योग्य मानतात परंतु त्यांच्यातील उच्च निच्चतेचा विरोध करतात. मात्र आंबेडकर हे निरीश्वरवादी, परिवर्तनशीलतेचा स्वीकार करणारे विचारवंत असून वेदाचे प्रमाण नाकारतात.

Issue VI , Vol. I (Indexed) June, 2026	Peer Reviewed SJIF Impact factor	ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

7. निष्कर्ष

7.1. डॉ. आंबेडकर व महात्मा गांधींच्या अनुक्रमे परिवर्तनशील व सनातन दृष्टिकोनाचा अभ्यास करता असे दिसून येते की आधुनिक चिंतन परंपरेत या दोन वेगवेगळ्या विचारधारा आहेत.

7.2. वरील दोन्ही विचारधारेतील अंतिम सत्याचे स्वरूप या संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास असे सांगतो की महात्मा गांधी हे मानवाच्या आंतरिक अध्यात्मिक तत्वाला चालना देतात तर बाबासाहेब आंबेडकर हे मानवाच्या समाजातील बाह्य घटकाचा सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या दृष्टीने नैतिक मूल्यांवर जास्त भर देतात.

7.3. दोन्ही विचारधारेतील तत्वे हे विरोधाभासिक असल्याने त्यांचा समन्वय साधने हे तितकेच अवघड असणार आहे जे की एका नवीन संकल्पनेची अभ्यासकांना चालना देते.

7.4. समाजात सुसंगता निर्माण करायचे असेल तर गांधीजींचे सत्य व अहिंसा तत्वांचा स्वीकार करणे तसेच बाबासाहेबांचा वैज्ञानिक व व्यावहारिक दृष्टिकोन बाळगून अज्ञानाला दूर सारून प्रज्ञा, करुणा व समता इत्यादी नैतिक मूल्यांचे महत्त्व समजून त्यांचा अंगीकार करणे गरजेचे आहे.

8. संदर्भसूची

8.1. आंबेडकर, बी. आर. (१९५७). द बुद्ध अँड हिज धम्म. बॉम्बे: सिद्धार्थ प्रकाशन.

8..2. आंबेडकर, बी. आर. (१९९३). भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म (एम. व्ही. पटवर्धन, अनु.). सिद्धार्थ प्रकाशन. (मूळ कार्य १९५७ मध्ये प्रकाशित)

8.3. गांधी, एम. के. (१९९८). सत्याचे प्रयोग किंवा आत्मकथा (बी. हेडा, अनु.). नवजीवन पब्लिशिंग हाऊस. (मूळ कार्य १९२७ मध्ये प्रकाशित)

8.4. गांधी, एम. के. (२००४). महात्मा गांधींचे विचार (आर. के. प्रभू व यू. आर. राव, संक. आणि संपा.; बी. हेडा, अनु.). नवजीवन पब्लिशिंग हाउस. (मूळ कार्य १९४५ मध्ये प्रकाशित)